**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे. रु.३४,९८,७६२/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ४७४ दिनांक :- ९/८/२०२४

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे. रु.३४,९८,७६२/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वि.वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे. रु.३४,९८,७६२/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वि. वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**